# सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल
# पोलीस शिपाई भरती
# सन २०२२ - २०२३

## आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गामध्ये निर्णय राखून ठेवण्यात आलेल्या पदाची तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करणेबाबत

१. सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती-२०२२-२३ मधील ११८ पोलीस शिपाई (५ बॅन्डस्मन पदासह) रिक्त पदांकरिता घेण्यात आलेल्या भरती संदर्भात मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, यांचेकडील क्रमांक अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती-२०२२-२३/१७३/२०२३/१०४०, दिनांक. ३०/०७/२०२४ अन्वये मार्गदर्शनानुसार ज्या मराठा समाजातील उमेदवारांनी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातून आवेदन अर्ज सादर केले आहेत अशा उमेदवाराचा निकाल राखीव ठेवून इतर प्रवर्गातील उमेदवारांची [Provisional] निवड व प्रतिक्षा यादी www.sindhudurgpolice.gov.in या संकेतस्थळावर दि.०७/०८/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

२. तथापि मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, यांचेकडील क्रमांक अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती-२०२२-२३/१७३/२०२३/१२००, दिनांक २३.०८.२०२४ च्या पत्रान्वये शासनाने सन २०२२-२०२३ पोलीस शिपाई भरतीमध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व इतर मागास वर्ग प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तसेच इतर कोणत्याही मागास प्रवर्गास आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गाचा विकल्प अनुज्ञेय राहणार नाही असे अभिप्राय दिल्याने सदर अभिप्रायानूसार आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातून त्यांचे नाव वगळण्यात यावे व जर ते आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गाऐवजी खुल्या प्रवर्गात पात्र ठरत असल्यास त्यामध्ये त्यांचा लेखी विकल्प घेवून समावेश करावा व त्याप्रमाणे तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी सुधारीत करावी अशा सूचना दिलेल्या आहेत.

३. उपरोक्त नमूद पत्रातील सूचनांप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ मध्ये आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील उमेदवारांच्या निवडीसंदर्भात राखीव ठेवण्यात आलेल्या पदाकरीता प्रतिक्षायादीवरील खालील उमेदवारांची निवड करण्यात येत आहे. तसेच इडब्ल्यूएस् प्रवर्गात प्रतिक्षा यादीवर कोणीही उमेदवार उपलब्ध नाहीत.

| अक्र | चेस्ट नंबर | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | ३३८८ | नम्रता कचरुलाल भुतडा | इडब्ल्यूएस् (महिला) |
| २. | २३४८ | युनूस उमराव शेख | इडब्ल्यूएस् सर्वसाधारण |

४. तात्पुरती निवड यादी ही मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे फेर पडताळणी/ तपासणी व भरती निकषांची पुर्तता अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर तात्पुरत्या निवड यादीमध्ये उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणून त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

५. संबंधित उमेदवार यानी मुळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे पडताळणीसाठी दि.२७/०८/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग येथे हजर रहावे.

६. पोलीस भरती प्रक्रिये दरम्यान आवश्यक ते बदल/निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

**ठिकाण:- सिंधुदुर्गनगरी**
**दिनांक:- २६/०८/२०२४**

SUPERINTENDENT OF POLICE SINDHUDURG
सत्यमेव जयते
पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग

**(सौरभ कुमार अग्रवाल)**
**अध्यक्ष**
**पोलीस भरती निवड मंडळ, तथा**
**पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग**

Scanned with OKEN Scanner